पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/४६८/२०१०
दिनांक- १३/०५/२०१०

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक १८.०५.२०१० रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक १८.०५.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक- १६९

दिनांक- १८.०५.२०१० वेळ- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक १८.०५.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक- १) वॉर्ड क्र.५८ रावेत पुनावळे मध्ये विविध ठिकाणी नव्याने झालेल्या रस्त्यावर जुने पोल फिटींग वापरून दिवाबत्ती सोय करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने पुजा इलेक्ट्रीकल वर्कस यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४८,९५७/- [र.रू.आठ्ठेचाळीस हजार नऊशे सत्तावन्न] पेक्षा १ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २) सांगवी स.नं.८४ येथील H.T. कियॉक्स युनिट मधिल सी.टी. बदलणेचे तातडीचे काम मे.व्हॅन इंजि.कं., पुणे यांचेकडून करून घेण्यास व अपेक्षित र.रू.४५,६०५/- [र.रू.पंचेचाळीस हजार सहाशे पाच] मे.व्हॅन इंजि.कं., पुणे यांना करारनामा न करता अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) मनपाच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागा अंतर्गत JNNURM (BSUP)प्रकल्पातील एकूण पात्र १४०० लाभार्थींना ओळखपत्र वाटप करावयाचे असलेने स्थानिक एजन्सी मे.युनिटी अडव्हरटायझींग यांचेकडून प्रकल्पातील एकूण १४०० लाभार्थ्यांचे ओळखपत्र र.रू.२७/- प्रति नग सर्व करांसह करून घेणेस व या प्रकल्पा अंतर्गत असलेल्या पात्र लाभार्थ्यांचे ३१/३/२०११ पर्यंत (१४०० x २७ = ३७,८००/-) र.रू.२७/- प्रति नग याच दरात निविदा न मागविता करारनामा करून न घेता र.रू.३७,८००/- पर्यंत येणाऱ्या खर्चास व त्याचप्रमाणे मार्च २०११ पुर्वी वाटप करावयाचे सदनिका संख्येत वाढ झालेस त्याही पात्र लाभार्थींस ओळखपत्र देणेकामी र.रू.२७/- प्रमाणे प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास तसेच सदरचा खर्च हा संगणक विभागाकडे असलेल्या JNNURM राखीव निधी मधील तरतूदीमधुन करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) मनपाच्या वतीने महाराष्ट्र दिन व संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त दि.२९/४/२०१० रोजी पिंपरीवाघेरे येथील यशवंतराव चव्हाण स्टेडीयमवर मराठी तारका या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे साठी मोठे स्टेज, मेकअप रूम, फायबर खुर्च्या, मैदानामध्ये व स्टेजवर मॅटींग इ.व्यवस्था करणे [अपेक्षित खर्च र.रू.५,००,०००/-] कामी अशा प्रकारचे काम मे.सिध्दी एंटरप्रायजेस (नि.नो.क्र.१/१२७-२००८/०९) हे ०.१०% कमी दराने करीत असले तरी सदरच्या कामाची तातडी व काम वेळेत पुर्ण करणे या अटीसहीत त्याचदराने व अटी शर्तीने करण्यास मे.वधवा मंडप ॲण्ड कंपनी यांनी मान्यता दिलेली असून त्यामध्ये त्यांनी नियमाप्रमाणे सर्व्हिस टॅक्स १०.३० % व वॅट टॅक्स १.५० % अदा करणेस विनंती केलेली असल्याने उपरोक्त काम थेट पध्दतीने करणेच्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ५) बी.आर.टी.सिस्टीम व नागरी व्यवस्थापन या संदर्भात लंडन, कोपन हेगन, मेक्सिको शहर व बोगोटा या शहरातील प्रत्यक्षात कार्यान्वीत असलेल्या प्रकल्पांची पाहणी करणेसाठी, मनपा मधील बीआरटीएस प्रकल्प विकसीत करणेसाठी व सदर कामास पुर्णपणे जबाबदार असलेल्या २ अधिकाऱ्यांचे नामनिर्देशन पाठविणेस कळविणेत आल्याप्रमाणे मा.आयुक्त श्री.आशिष शर्मा व कार्यकारी अभियंता, श्री.एम.टी.कांबळे या दोन अधिकाऱ्यांना उपरोक्त नमुद केलेल्या ठिकाणी परदेश दौऱ्यास व होणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) तळवडे वॉर्ड क्र.१ येथील इन्फोटेक पार्क कडून चाकणकडे जाणाऱ्या नवीन पुलाशेजारी जकात नाका केबीन बसविणे कामाची निकड लक्षात घेता व कालापव्यय टाळणेसाठी या प्रकारचे काम करणारे ठेकेदाराकडून निविदा/कोटेशन मागविता असता मे.एन.डि.ए.प्लास्टेक यांचे र.रू.३,५६,४००/- चे कोटेशन लघुत्तम असल्याने निविदा न मागविता परंतू करारनामा करून मे.एन.डि.ए.प्लास्टेक यांचेकडून र.रू.३,५६,४००/- चे खर्चात करून घेण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ७) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सुट्टीचे काळातील मदरसा प्रशिक्षण कोर्सबाबत (सेतू प्रकल्प अंतर्गत) खर्च [एका वर्षाचा र.रू.४,०६,०००/-] अपेक्षित असल्याने सदर उपक्रम राबविणे करीता येणाऱ्या खर्चास तसेच प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ८) मनपाच्या लेखा विभागातील JNNURM ची व राखीव निधीची सर्व खाती यांचे कामकाज सन २००८-०९ या आर्थिक वर्षापासून Tally मध्ये करण्याचे तांत्रिक काम र.रू.१,४२,५००/- [र.रू. एक लाख बेचाळीस हजार पाचशे] मध्ये मे.सतिश नगरे ॲण्ड असोशिएटस्, चार्टर्ड अकाऊंटंट यांना करण्याबाबत कळविलेले असून सन २००५-२००६, २००६-२००७ व २००७-२००८ व त्यानुषंगाने पुढील वार्षिक ताळेबंदपत्रक करण्याच्या दृष्टीने, स्थावर मालमत्तेची माहिती Voucher तपासणी करून तयार करण्याचे काम वार्षिक र.रू.१,५०,०००/- [+ सर्व्हिस टॅक्स स्वतंत्र] फी घेऊन करण्याबाबत करारनामा केला असून तसा आदेश त्यांना दिलेला असल्याने त्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ९) मनपाच्या जनगणना विभागाने तातडीने मागणी केलेल्या क्लिप राईटिंग पॅड स्टेशनरी साहित्य खरेदीकामी मे.सिध्दी कॉपियर्स, पिंपरी यांचेकडून क्लिप राईटिंग पॅड स्टेशनरी ५०० नग साहित्याचे लघुत्तम दर एकूण र.रू.११,५००/- स्विकृत करण्यात आलेले असून मे.सिध्दी कॉपियर्स, पिंपरी यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या तातडीचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १०) ब प्रभागा अंतर्गत पिंपरी येथील डिझेल शवदाहीनी व समाज मंदीरा मध्ये वॉर्डस्तरीय योजनेमधुन विद्युत विषयक कामे करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने वॉर्डस्तरीय योजनेतून करण्यात येत असल्याने मे.विमलाई इलेक्ट्रीक कार्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू. ४९,९६५/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे पासष्ट] पेक्षा १.२% कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ११) मा.सभापती, झोपडपट्टी सुधार गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती यांना उपलब्ध करून देणेत आलेल्या वाहन क्र.एम.एच-१४-एई०८०३४ या वाहनास नवीन टायर-ट्यूब बसविणे आवश्यक असलेने ५ नग टायर-ट्यूब खरेदीकामी होणारा खर्च

र.रू.१३,७५०/- [र.रू.तेरा हजार सातशे पन्नास] मे.बालाजी टायर्स, चिंचवड यांना अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १२) मनपा हद्दीतील प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेनुसार मौजे भोसरी येथील स.नं.६९० पैकी या मिळकतीमध्ये आरक्षण क्र.४१३ पोलीस चौकी व दवाखानासाठी सुमारे ९ आर क्षेत्र आरक्षित असून सदर आरक्षणाने बाधित जमीनी खाजगी मालकीची असल्याने बाधित होणाऱ्या मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (१) सह भूसंपादन अधिनियम १८९४ अंतर्गत भूसंपादन करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.६० बळवंतनगर मधील रस्ते कारपेट पध्दतीने डांबरीकरण करणे (फेरनिविदा) कामी मे.अजवानी इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रू.१९,४४,२३७/- [र.रू.एकोणीस लाख चव्वेचाळीस हजार दोनशे सदोतीस] पेक्षा १८.५५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू. १५,८३,५८१/- [र.रू.पंधरा लाख त्र्याऐंशी हजार पाचशे एक्याऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.६० चिंचवडेनगर मधील उर्वरीत रस्ते कारपेट पध्दतीने डांबरीकरण करणे (फेरनिविदा) कामी मे.अजवानी इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रू.१९,४४,५८४/- [र.रू. एकोणीस लाख चव्वेचाळीस हजार पाचशे चौऱ्याऐंशी] पेक्षा १८.५५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू. १५,८३,८६३/- [र.रू.पंधरा लाख त्र्याऐंशी हजार आठशे त्रेसष्ट] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम

अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १५) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२८ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला बचतगट समता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमास प्रति महिला लाभार्थी प्रति दिन र.रू.१००/- या प्रमाणे दोन दिवसीय कार्यक्रम राबविणेस अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे यांना दि.३१/३/२०११ पर्यंत मुदतवाढ देणेस व या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १६) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२९ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिलांना विविध व्यवसाय प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षण अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था गेल्या ३ वर्षांपासून चांगल्याप्रकारे राबवित असल्या कारणाने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांना दि.३१/३/२०११ पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १७) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.३० नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ विभागामार्फत बालवाडया चालविल्या जातात या बालवाडयांमध्ये ज्या शिक्षिका मानधन तत्वावर काम करतात त्या शिक्षिकांच्या मानधनात

| | सेवा कालावधी | मानधन र.रु. |
|---|---|---|
| १) | २ ते ४ वर्षे | ३०००/- |
| २) | ४ ते ६ वर्षे | ३५००/- |
| ३) | ६ ते ८ वर्षे | ४०००/- |
| ४) | ८ ते १० वर्षे | ४५००/- |
| ५) | १० ते १२ वर्षे | ५०००/- |
| ६) | १२ ते १४ वर्षे | ६०००/- |
| ७) | १४ ते १६ वर्षे | ६५००/- |
| ८) | १६ ते १८ वर्षे | ७०००/- |
| ९) | १८ ते २० वर्षे | ७५००/- |
| १०) | २० ते २२ वर्षे | ८०००/- |

उपरोक्तप्रमाणे वाढ करण्यास तसेच मुख्य समन्वयक यांना र.रु. १०,०००/- मानधन देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १८) मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- १९) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.१५५ अन्वये, मामुर्डी साईनगर परिसरात बंद पाईप गटर करणेकामी मे.एच.सी.लुंकड (नि.र.रू.२३,२४,५००/- [र.रू. तेवीस लाख चोविस हजार पाचशे] पेक्षा ४.०० % जास्त) (सन २००८-०९ च्या चालू दराशी तुलना करता ५.३६ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.२४,१७,४८०/- [र.रू. चोविस लाख सतरा हजार चारशे ऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २०) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, प्रभाग क्र.३२ संततुकारामनगर येथील विरंगुळा केंद्राचे स्थापत्य विषयक सुधारणाची कामे करणेकामी मे.शितल कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.१८,७६,५००/- [र.रू.अठरा लाख शहात्तर हजार पाचशे] पेक्षा ८.०० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.१७,२६,३८०/- [र.रू.सतरा लाख सव्वीस हजार तीनशे ऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २१) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२००९-२०१० मधील अ.क्र.२० अन्वये, वॉर्ड क्र.८ से.नं.१३ उर्वरित रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.गजानन वाल्हेकर (नि.र.रू. ४,६४,९८९/- [र.रू.चार लाख चौसष्ट हजार नऊशे एकोणनव्वद] पेक्षा २८.८० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २२) मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.३/२००९-२०१० मधील अ.क्र.१ अन्वये, अ प्रभाग अंतर्गत से.क्र.२६ व मोहननगर जलतरण तलावातील फिल्टरेशन प्लेट संबंधीत यांत्रिक/विद्युत विषयक कामे करणेकामी मे.प्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन (नि.र.रू.३,१८,३३६/- [र.रू.तीन लाख अठरा हजार तीनशे छत्तीस] पेक्षा १५.३० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २३) महाराष्ट्र शासन निर्णयान्वये पी.एम.टी. व पी.सी.एम.टी. या दोन्ही संस्था एकत्र होऊन पी.एम.पी.एम.एल. या नावाने नवीन संस्था स्थापन झाली असुन शासन निर्णयानुसार मागील तीन वित्तीय वर्षात पीएमटी व पी.सी.एम.टी. दोन्ही महापालिकांनी खर्च भागविणे साठी जे अनुदान दिले असेल त्याची सरासरी काढून सरासरी एवढे अनुदान संबंधीत महापालिका कंपनीकडे वर्ग करेल असे कळविले नुसार या मनपाने रक्कम अदा केलेली असून सदर तीन वर्षे कालावधीची मुदत दि.३१ मार्च, २०१० रोजी पुर्ण झाली असल्याने सन २०१०-११ या आर्थिक वर्षात मुदत पुर्ण झाल्याने परिवहन विभागास उचल या लेखाशिर्षावर कोणतीही तरतूद केलेली नसून तसे पी.एम.पी.एम.एल. यांना कळविण्यात देखील आलेले असताना पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी एप्रिल २०१० चे वेतन अदा करणेसाठी र.रू.१ कोटी २७ लाख मिळणेकामी विनंती केली असल्याने वरील बाबी विचारात घेता पी.एम.पी.एम.एल. यांना रक्कम अदायगीबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २४) ड प्रभाग व मुख्यालयातील रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेचे काम (नि.क्र.६/४-२००९-१० सुमारे ४.३० कोटी रू.) निविदा अट व शर्त क्र.३८ नुसार क प्रभागातील निविदा क्र.६/३-०९/१० मधुन मंजुर निविदा दराने (२४.६९ % कमी) मे.ठाकुर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचेकडून करून घेण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २५) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १२/५/२०१० ठराव क्र.३२ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.१६ इयत्ता १२ वी नंतरचे वैद्यकिय (M.B.B.S), अभियांत्रिकी संगणक प्रथम वर्ष पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ०६ लाभार्थींना प्रत्येकी र.रू.७५००/- प्रमाणे एकत्रित र.रु. ४५,०००/- अदा करणेस तसेच या योजनेसाठी प्राप्त अर्जांमध्ये जे अर्ज कागदपत्रांच्या पुर्तते अभावी अपात्र आहेत त्यांनी पूर्तता केल्यास त्यांनासुध्दा योजनेच्या नियमानुसार अर्थसहाय्याचा लाभ देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २६) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १२/५/२०१० ठराव क्र.३३ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.०३ मुलींना तांत्रिक प्रशिक्षणाकामी अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत अर्चना बाळासाहेब धायगुडे यांना र.रु.२,०००/- अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २७) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १२/५/२०१० ठराव क्र.३४ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मुलींना यो.क्र.१० खाजगी क्लासची फी देणेकामी अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे २३ लाभार्थींना प्रत्येकी र.रु.१,०००/- प्रमाणे एकत्रित र.रु.२३,०००/- अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २८) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १२/५/२०१० ठराव क्र.३५ नुसार, सन २००८ - ०९ या आर्थिक वर्षात यो.क्र.१५ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील परदेशी उच्च शिक्षण /प्रशिक्षण घेण्या-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत ऐश्वर्या अशोक कोटस्थाने व रिमा विजय देवधर यांनी MBA या अभ्यासक्रमासाठी लंडन स्कुल ऑफ मार्केटिंग, लंडन या ठिकाणी प्रवेश घेतला असल्याने योजनेच्या अटी व शर्तीनुसार दोन्ही अर्ज पात्र झाले असल्याने त्यांना प्रत्येकी र.रु.१,००,०००/- याप्रमाणे विद्यापीठाचे नावे अदा करण्यास व त्याकामी येणा-या र.रु. २,००,०००/- चे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/४६८/२०१०
दिनांक : १३/०५/२०१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.